दै भास्कर (10)

# चुनाव आचार संहिता का प्रभावी रूप से करें अमल : सहारिया

**मतदान का परिमाण बढ़ाने के लिए व्यापक जनजागृति करें**



जिला संवाददाता | नांदेड़

ग्रामपंचायत व नांदेड़ वाघाला शहर महानगरपालिका के चुनाव निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरण में संपन्न कराने के लिए चुनाव आचारसंहिता का प्रभावी रूप अमल किया जाए। इसी तरह मतदान का प्रमाण बढ़ाने के लिए व्यापक प्रमाण में जनजागृति करें। ऐसे आदेश राज्य चुनाव आयुक्त जे.एस.सहारिया ने दिया।

जिलाधिकारी कार्यालय परिसर के डॉ.शंकरराव चव्हाण नियोजन भवन सभागृह में ग्रामपंचायत व नांदेड़ वाघाला शहर महानगरपालिका चुनाव संदर्भ में जायजा बैठक चुनाव आयुक्त सहारिया बोल रहे थे। उन्होंने आगे कहा कि कानून व सुव्यवस्था संबंधी जायजा लेते हुए वस्तु अथवा पैसों के स्वरूप में लालच को रोक लगाना, अवैध शराब यातायात पर तथा आवंटन पर नजर रखना चाहिए। मतदान का प्रमाण बढ़ाने के लिए व्यापक प्रमाण में मतदाता जनजागृति मुहिम शुरू की जाए। सीधे सरपंच पद के लिए पहली बार मतदान हो रहा है। बहुसदस्यीय पद्धति के अनुसार आवश्यक उतने मद देना इस बारे में भी मतदाता जनजागृति की जाए। दिव्यांग मतदाओं को मतदान करना आए, इसलिए व्हीलचेअर, रॅम की व्यवस्था करना, मतदान केंद्रे सभीं सुविधा ने अद्यावत व आधुनिक हो। लोकसभा व विधानसभा चुनाव पद्धति से इस चुनाव की प्रक्रिया चलाने पर जोर देना चाहिए ऐसा भी कहा। इस समय राज्य चुनाव आयोग के सचिव शेखर चन्ने ने कहा कि चुनाव से संबंधित यंत्रणा ने अधिक सर्तक रहकर चुनाव निर्भय वातावरण में संपन्न कराए। मतदाता जनजागृति के साथ-साथ मतदाताओं को व्होटर स्लिप का आवंटन करें। चुनाव लड़नेवाले उम्मीदवारों को ऑनलाइन आवेदन भरना है। इसलिए आवश्यक सभी सुविधा उपलब्ध कराकर दी जाए। सिंगल विंडो सिस्टीम शुरू कर उम्मीदवारों को आवश्यक अनुमति दी जाए ऐसी सूचना दी।

## लापरवाही बरतने पर होगी कार्रवाई

राज्य चुनाव आयोग ने ग्रामपंचायत व नांदेड़ वाघाला शहर महानगरपालिका के चुनाव का कार्यक्रम घोषित किया है। इसलिए आदर्श आचारसंहिता लागू होने से उसका प्रभावी रुप से अमल करने सख्त निर्देश दी है। इस चुनाव के संदर्भ में आयोग द्वारा दी गई, सूचना के अनुसार कार्रवाई की जाए। चुनाव के संबंधित काम में लापरवाही या कोताही करनेवाले अधिकारी, कर्मियों पर कठोर कार्रवाई की जाएगी ऐसा भी चुनाव आयोग सहारिया ने कहा।

## इनकी थी उपस्थिति

इस बैठक में राज्य चुनाव आयोग के शेखर चन्ने, जिलाधिकारी अरूण डोंगरे, पुलिस अधीक्षक चंद्रकिशोर मीना, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिनगारे, मनपा आयुक्त गणेश देशमुख, अप्पर जिलाधिकारी सतीष पाटील, निवासी उपजिलाधिकारी जयराज कारभारी, आदि वरिष्ठ अधिकारी उपस्थित थे।

जिलाधिकारी अरूण डोंगरे ने जिले के ग्रामंपचायत चुनाव संबंधी जानकारी देते हुए बताया कि मतदान केंद्र निश्चित किए हैं, मतदान की मशिन पर्यास है, चुनाव के लिए अधिकारी, कर्मियों की नियुक्ति की गई है। अवैध शराब बिक्री, व शराब की यातायात को रोक लगाने के लिए उपाय किए गए है। मतदान का प्रमाण बढ़ाने के लिए मतदान जनजागृति की जा रही है। ग्रामपंचायत चुनाव पारदर्शिता के साथ पूर्ण हो, इसलिए जिला प्रशासन प्रय|शील है। मनपा आयुक्त गणेश देशमुख ने भी नांदेड़ वाघाला शहर महानगरपालिका के चुनाव संबंधी जानकारी दी। इस बैठक में पुलिस अधीक्षक चंद्रकिशोर मीना ने चुनाव संबंधी पुसिल प्रशासन, पुलिस विभाग की जानकारी दी। बैठक के प्रारंभ में उपजिला चुनाव अधिकारी अनुराधा ढालकरी ने प्रस्तावना की और जिप के मुख्य कार्यकारी अधिकारी ने आभार माने। इस बैठक को ग्रामपंचायत व नां.वा.शहर महानगरपालिका के चुनाव निर्णय अधिकारी, सहायक चुनाव त्रिर्णय अधिकारी, चुनाव निरीक्षक, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, राज्य उत्पादन शुल्क विभाग, बैंक, आयकर विभाग, पुलिस, वस्तु व सेवाकर विभाग, महावितरण आदि विभाग के अधिकारी उपस्थित थे।

दै. सकाळ (१५)

# उमेदवारांच्या माहितीचे फलक केंद्राबाहेर लावणार

## जे. एस. सहारिया यांची माहिती ; वादग्रस्त उमेदवारांबाबतची माहिती मतदारांना कळणार

**नांदेड, ता. १३ (बातमीदार) :** महापालिका निवडणुकीत पहिल्यांदाच उमेदवारांची स्थावर, जंगम व गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या माहितीचे फलक मतदान केंद्राबाहेर लावण्यात येणार आहेत. मतदारांना आपला योग्य उमेदवार निवडता येईल यासाठी ही व्यवस्था निवडणूक आयोगाने केली आहे, अशी माहिती राज्याचे निवडणूक आयुक्त जे. एस. सहारिया यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.

दरम्यान, नांदेड जिल्ह्यात महापालिका व काही ग्रामपंचायत निवडणुका होत आहेत. या निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झाले आहे. पहिल्यांदाच मतदान केंद्राबाहेर उमेदवारांची माहिती लावण्यात येणार आहे; तसेच मतदारांनी निर्भयपणे मतदान प्रक्रियेत भाग घ्यावा व मतदानाची टक्केवारी वाढवावी, असे आवाहनही सहारिया यांनी केले. निवडणूक सचिव शेखर चन्ने, जिल्हाधिकारी अरुण डोंगरे, पोलिस अधीक्षक चंद्रकिशोर मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिनगारे, पालिका आयुक्त गणेश देशमुख, उपविभागीय अधिकारी प्रदीप कुलकर्णी, अनुराधा ढालकरी, उपायुक्त रत्नाकर वाघमारे उपस्थित होते.

महापालिकेची निवडणूक ११ ऑक्टोबर रोजी होत आहे. या निवडणुकीत पहिल्यांदाच उमेदवारांची स्थावर, जंगम व गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले होर्डिंग्ज मतदान केंद्राबाहेर लावण्यात येणार आहेत. जेणेकरून मतदारांना आपला योग्य उमेदवार निवडता येईल, असे सांगून सहारिया म्हणाले, की या निवडणुकीसाठी तीन लाख ९६ हजार ८७२ मतदारांची नोंदणी झाली आहे. ५३६ मतदान केंद्र तयार करण्यात आले असून पाच हजारांहून अधिक अधिकारी व कर्मचारी नियुक्त केले आहेत. निवडणूक काळात मतदारांना उमेदवारांकडून आमिष दाखविण्यात येऊ नये म्हणून प्रशासकीय यंत्रणा लक्ष ठेवून राहणार आहे. मतदारांना फोटोसह १०० टक्के मतदान स्लिप घरपोच देण्यात येणार आहे. अवैध व्यवसायावर नियंत्रण मिळावे म्हणून या काळात प्राप्तीकर, पोलिस, उत्पादन शुल्क, विक्रीकर आदी विभागांचे अधिकारी कार्यान्वित करण्यात आले आहेत. रेल्वे, विमान, बँका, दळणवळणाची साधने यावर नियंत्रण ठेवण्यात येणार आहे. वरिष्ठ सचिव म्हणून संतोष कुमार व व्ही. के. पाटील त्यांना सहकार्य करतील. शिवाय तीन अतिरिक्त प्रभारी जिल्हाधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. महापालिकेबरोबरच जिल्ह्यातील मुदत संपलेल्या १७५ ग्रामपंचायतींची निवडणूकही होत आहे. माहूर, किनवट व लोहा या तालुक्यातील ग्रामपंचायतींचा यात समावेश आहे. किनवट



**नांदेड : निवडणूक आयुक्त जे. एस. सहारिया यांनी अधिकारी, कर्मचाऱ्यांची बैठक घेतली.**

तालुक्यातील चार ग्रामपंचायतींची निवडणूक २६ सप्टेंबर तर लोहा व माहूर तालुक्यातील ग्रामपंचायतींची निवडणूक सात ऑक्टोबर रोजी होणार आहे. ग्रामपंचायतच्या सीमावर्ती गावातही आचारसंहिता लावण्यात आली आहे. या सर्व निवडणुकीत एक लाख ६३ हजार ३८३ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. त्यासाठी ६५ निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

दै. लोकमत (१६)

# उमेदवारांची माहिती केंद्राबाहेर लागणार

## ▶राज्य निवडणूक आयुक्त सहारिया यांची माहिती

**नांदेड : प्रतिनिधी**

नांदेड वाघाळा शहर महापालिकेची निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराची पार्श्वभूमी काय आहे, गुन्हे दाखल आहेत काय, शिक्षा झाली आहे काय, याची सर्व माहिती मतदारांना मिळावी यासाठी ठळक अक्षरातील फलक मतदान केंद्राबाहेर लावण्यात येणार आहेत तर यावेळी मनपा निवडणुकीत प्रथमच ऑनलाइन नामनिर्देशन पत्र भरण्याची पद्धती वापरण्यात येणार आहे, असे राज्य निवडणूक आयुक्त जे. एस. सहारिया यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मिनी सह्याद्री विश्रामगृहात बुधवारी ग्रामपंचायत व नांदेड वाघाळा शहर महापालिका निवडणुकीसंदर्भात पत्रकार परिषद घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने,



▶महापालिकेसाठी २० प्रभागांची रचना असून ८१ जागा आहेत. ११ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी ५३६ मतदान केंद्र आहेत.

▶ ३ लाख ९६ हजार ८७२ मतदार यात भाग घेणार आहेत, तर आचारसंहितेची कडेकोट अंमलबजावणी होण्यासाठी आठ अधिकाऱ्यांची नियुक्ती आहे.

▶उमेदवारांच्या खर्चावर लक्ष ठेवण्यासाठी केंद्राकडून चार आयकर अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, तर निवडणुकीच्या सर्व प्रक्रियेवर शासनाचे सचिव संतोषकुमार हे लक्ष ठेवणार आहेत.

जिल्हाधिकारी अरुण डोंगरे, पोलीस अधीक्षक चंद्रकिशोर मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिनगारे, मनपा आयुक्त गणेश देशमुख, अप्पर जिल्हाधिकारी संतोष पाटील, निवडणूक निरीक्षक अविनाश पाठक, पी. पी. पाटोदेकर आदींसह इतरांची उपस्थिती होती. महापालिका निवडणुकीसंदर्भात पुढे माहिती देताना राज्य निवडणूक आयुक्त सहारिया म्हणाले की, लोकशाही बळकट करण्याची सर्वोच्च न्यायालयाने जे निर्देश दिले आहेत.

यानुसारच ज्या सूचना दिल्या आहेत, त्याची अंमलबजावणी निवडणूक आयोग करीत आहे. यावेळी निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारांची संपूर्ण पार्श्वभूमी सांगणारे माहिती फलक मतदार केंद्राबाहेर ठळक अक्षरात लावण्यात येणार आहेत.

यात कोणी गुन्हा केला काय. कोणास शिक्षा झाली आहे.

संपत्ती आणि स्थावर मालमत्ता किती आहे, याची माहिती राहणार आहे, असेही निवडणूक आयुक्त सहारिया यांनी यावेळी सांगितले.

दै गोदातीर (1)

# निवडणूक आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करावी - राज्य निवडणूक आयुक्त सहारिया

**नांदेड** - ग्रामपंचायत व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडणेसाठी निवडणूक आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करावी. तसेच मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी व्यापक प्रमाणात जनजागृती करावी, असे आदेश राज्य निवडणूक आयुक्त जे. एस. सहारिया यांनी आज येथे दिले.

नांदेड येथील जिल्हाधिकारी कार्यालय प्रांगणातील डॉ. शंकरराव चव्हाण नियोजन भवन सभागृहात ग्रामपंचायत व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका निवडणूक संदर्भात आढावा बैठक राज्य निवडणूक आयुक्त जे. एस. सहारिया यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राज्य निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने, जिल्हाधिकारी अरुण डोंगरे, पोलीस अधीक्षक चंद्रकिशोर मिना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिनगारे, मनपा आयुक्त गणेश देशमुख, अप्पर जिल्हाधिकारी संतोष पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी जयराज कारभारी आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यामुळे आदर्श आचारसंहिता लागू झाल्याने त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यावर अधिकाऱ्यांनी भर द्यावा, अशा सक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत. या निवडणुकासंदर्भात आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करावी. निवडणूक संदर्भातील कामात निष्काळजीपणा व कुचराई करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असेही सहारिया यांनी सांगितले.

कायदा व सुव्यवस्थेसंबंधी आढावा घेताना वस्तू अथवा पैशाच्या स्वरुपातील प्रलोभनाला आळा घालणे, अवैध दारू वाहतुकीवर व वाटपावर नजर ठेवणे, असे सांगून सहारिया म्हणाले की मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी व्यापक प्रमाणात मतदार जागृती मोहीम हाती घ्यावी. थेट सरपंच पदासाठी पहिल्यांदा मतदान होत आहे. बहुसदस्यीय पद्धतीनुसार आवश्यक तेवढे मते देणे याबाबत देखील मतदार जागृती करण्यात यावी. दिव्यांग मतदारांना मतदान करता यावे यासाठी व्हीलचेअर, रॅम्पची व्यवस्था करणे, मतदान केंद्रे सर्व सुविधेने अद्ययावत व आधुनिक असावेत. लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या पद्धतीनेच या निवडणुकीची प्रक्रिया राबविण्यावर भर दिला पाहिजे, अशा सूचनाही सहारिया यांनी यावेळी दिल्या.

यावेळी राज्य निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने म्हणाले की, निवडणुकीशी संबंधित यंत्रणांनी अधिक सतर्क राहून निवडणुका निर्भय वातावरणात पार पाडाव्यात. मतदार जागृती बरोबर मतदारांना व्होटर स्लीपचे वाटप करावे. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरावयाचे असल्याने त्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. सिंगल विंडो सिस्टीम सुरू करून उमेदवारांना आवश्यक परवानगी देण्यात याव्यात, यासारख्या विविध सूचना त्यांनी दिल्या.

दै उ मराठवाडा (2)



# सुदृढ लोकशाहीसाठी मतदान करा : सहारिया

नांदेड (प्रतिनिधी) - सुदृढ लोकशाहीसाठी जास्तीत जास्त मतदारांनी करावे, असे आवाहन राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त ज.स. सहारिया यांनी आज पत्रकार परिषदेत बोलताना केले. महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने आज सहारिया हे नांदेड दौऱ्यावर आले होते.

सहारिया यांनी नियोजन भवन येथे महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने बैठक घेतली. त्यानंतर येथील शासकीय विश्रामगृहात पत्रकारांशी संवाद साधला. महापालिका निवडणुकीसह जिल्ह्यात ग्रामपंचायतींच्या निवडणुका होत असून या निवडणुकांसाठी प्रशासनाने सर्वतोपरी तयारी केली आहे. महापालिका निवडणुकीत ३ लाख ९६ हजार ८७२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार असून ५३६ मतदान केंद्रांवर ५ हजार अधिकारी-कर्मचारी या निवडणूक प्रक्रियेसाठी तैनात करण्यात आले असून पुरेसा पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे. आचारसंहितेची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जाणार असून उमेदवारांची संपूर्ण माहिती मतदान केंद्राबाहेर तसेच वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केली जाणार आहे, असे यावेळी सहारिया यांनी सांगितले.

या निवडणुकीत रोखीने व्यवहार होण्याची शक्यता लक्षात घेता सर्व बँकांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. आदर्श आचारसंहितेचे पालन करण्याच्या सूचना प्रशासनास देण्यात आल्या असून मतदारांना व्होटर्स स्लीपचे वाटप करण्यात येणार आहे. व्हीव्हीपीएटी मशीन्सद्वारे मतदारांना स्लीप देण्याचा निर्णय अजून झाला नसून या मशीन्ससाठी शासनाने निधी उपलब्ध करून दिला आहे; परंतु वेळेत या मशीन्स उपलब्ध होतील किंवा नाही, असे यावेळी सहारिया म्हणाले.

मतदारांनी जास्तीत जास्त संख्येने मतदान करावे यासाठी जनजागृती करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. महापालिकेच्या

(शेवटच्या पानावर)